


पॅस्टर टोनी अलामो | द अलामो ख्रिश्चन नेशन | खंड 17600

# स्वर्गात घडणारी आश्चर्ये आणि त्यांच्या पृथ्वीवर दिसणाऱ्या खुणा

**लेखक टोनी अलामो**



टोनी आणि सुसान अलामो, ऑक्रेस्ट्रा आणि गायकवृंद, १९७० चे दशक व ८० ची सुरूवातीच्या वर्षांमध्ये त्यांच्या दूरदर्शन कार्यक्रमामध्ये.

आकाशात उडत्या तबकड्या पाहिल्याचे लाखो लोकांनी सांगितले आहे. उडत्या तबकड्या अस्तित्वात असतात हे नाकारण्याचे काहीही कारण नाही कारण त्या खरोखरच अस्तित्वात असतात.

येशूच्या शिष्यांनी त्याला विचारले "आम्हांला सांगा की या गोष्टी कधी होतील? तुम्ही परत येण्याचा आणि जगाचा शेवट होण्याचा काळ जवळ आला आहे हे आम्ही कोणत्या घटनांवरून ओळखावे? आणि येशूने उत्तर दिले आणि तो त्यांना म्हणाला कोणीही तुम्हांला फसवू नये म्हणून सावध असा. कारण असे अनेक आहेत की जे माझ्या नावाने येतील आणि ते म्हणतील, मी ख्रिस्त आहे,' आणि ते पुष्कळ लोकांना फसवतील. तुम्ही लढायांबद्दल आणि लढायांच्या अफवांबद्दल ऐकाल .[वेबस्टर डिक्शनरीनुसार, युद्धे म्हणजे भयानक साथीचे रोग, पीडा; ज्याला अपायकारक समजले जाते असे काहीही; ज्यामुळे मृत्यू होण्याची शक्यता असते; जे समाजासाठी घातक असते] पण त्यामुळे तुम्ही त्यांना भिऊ नका. या गोष्टी घडल्याच पाहिजेत. तरी इतक्यात शेवट जवळ येणार नाही. होय, एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर उठेल. अनेक ठिकाणी भूकंप व दुष्काळ येतील. [वादळे, पूर, लढाया, दुष्काळ, रोग] आणि भूकंप होतील. पण या सर्व गोष्टी म्हणजे वेदनांची सुरूवात होय. "तुमचे हाल करण्याकरिता ते तुम्हाला धरून देतील व तुम्हास जिवे मारतील आणि माझ्या नावामुळे सर्व राष्ट्रे तुमचा [ख्रिस्ताच्या आत्म्याने पुनर्जन्म झालेले] द्वेष करतील. त्यावेळी पुष्कळजण अडखळतील, एकमेकांस धरून देतील व एकमेकांचा द्वेष करतील" (मत्तय २४ :३-१०).[१] "तिरस्कार" या शब्दाचा अर्थ बेवस्टरच्या डिक्शनरीनुसार असा आहे, "दुसऱ्या व्यक्तींबद्दल मनांत तीव्र नावड असणे किंवा त्यांच्याबद्दल वाईट इच्छा करणे, व त्या व्यक्तींना टाळावेसे वाटणे. [जसे की, ईश्वराचा तिरस्कार करणे, बायबलचा तिरस्कार करणे, ख्रिश्चनांचा तिरस्कार करणे]"

ऍपॉस्टल पीटरने जोएलच्या भविष्यवाणीला दुजोरा देत म्हटले आहे "स्वर्गांत आश्चर्ये घडतील आणि पृथ्वीवर त्याच्या खुणा उमटताना दिसतील." (कृत्ये २:१९). तुम्हाला माहित आहे का की स्वर्गातील संरचनेमध्ये प्रचंड प्रमाणांत बदल घडलेले आहेत? तसेच, आकाशांत दिसणाऱ्या उडत्या तबकडया म्हणजे वेगळे काही नसून, ईश्वरी कोपाचा वर्षाव पृथ्वीवर करून ती नष्ट करण्याआधी पृथ्वीवर नजर ठेवणारे देवदूत आहेत? पृथ्वीवरील पापी लोकांवर क्रोधाचा वर्षाव करण्यासाठी ईश्वराने नेहमीच त्याचे दूतदूतपाठवले आहेत.[२]

उत्पत्ति ६:६-७ मध्ये सांगितले आहे की, म्हणून पृथ्वीवर मनुष्य निर्माण केल्याबद्दल परमेश्वराला वाईट वाटले; आणि तो मनात फार दु:खी झाला; तेव्हा तो म्हणाला, मी मातीपासून उत्पन्न केलेल्या मानवास नष्ट करीन; तसेच माणसे, पशू, सरपटणारे प्राणी, व आकाशातील पक्षी या सर्वांचा मी नाश करीन कारण या सर्वांना उत्पन्न केल्याचे मला दु:ख होत आहे."

येशूने मत्तय २४:३७-३९मध्ये म्हटले, "नोहाच्या दिवसात होते त्याप्रमाणे मनुष्याच्या पुत्राचे येणे होईल. महापूर येण्याअगोदर लोक खात-पीत होते. लोक लग्न करीत होते. लग्न करून देत होते. नोहा जहाजात जाईपर्यंत लोक या गोष्टी करीत होते. त्यांना माहीत नव्हते की काही तरी घडणार आहे. परंतु नंतर पूर आला आणि सर्व

*(पान २ वर पुढे सुरू)*

१ मार्क १३:१२-१३,ल्युक,१२:५१-५३,जॉन१६:१-३ २ जेन. १९:१, १३, २ सॅम.२४:१५-१७,२४:१५-१६, २ किंग्ज १९:३५ २ क्रॉन. ३२:२१, साल्म. ७८:४९, मॅथ्यू.१३:४१-४२, अॅक्ट्स १२:२३, २ थेस. १:७-९, रेव. ७:१-२, ९:१५, १५:१, प्रकरण. १६

## स्वर्गात घडणारी आश्चर्ये आणि त्यांच्या पृथ्वीवर दिसणाऱ्या खुणा

*(पान १ वरून पुढे सुरू)*

लोक मरून गेले. मनुष्याचा पुत्र आल्यावर असेच होईल." ईश्वराला या गोष्टीचा इतका पश्चाताप झाला होता की, त्याने नोहा जिवंत असताना, मानवाची निर्मिती केली, आणि त्याने स्वत: व आपल्या देवदूतांच्या सहाय्याने या पृथ्वीवरील अगदी लहानांत लहान गोष्टींचाही विनाश घडवून आणला व या विनाशकारी संहारातून फक्त नोहा, त्याची पत्नी व त्याचे तीन मुलगे आणि त्यांच्या बायका यांना ईश्वराने वाचवले. तुम्हाला असे वाटत नाही का की ईश्वर पुन्हा एकदा असाच संहार घडवून आणेल कारण नोहाच्या काळातील लोकांपेक्षा आत्ताच्या काळातील लोक अधिक पापी आहेत, होय ना?

महिला देवदूत नावाचा प्रकारच नाही. ईश्वराचे सर्व देवदूत पुरूष आहेत. उडत्या तबकडया चालवणारे सर्व देवदूत पुरूष रूपांतच असतात व पृथ्वीवरील सर्व बऱ्यावाईट घडामोडींवर त्यांचे बारीक लक्ष असते. व संपूर्ण पृथ्वीवर लवकरच जो संहार होणार आहे त्याची झलक ते आपल्याला दाखवत असतात. ईश्वराने चांगल्या दूतांच्या सहाय्याने पृथ्वीवरील मानवातील सैतानाची कामे नष्ट केली आहेत, जसे सोडोम व गोमोराह आणि धर्मग्रंस्थातील इतर अनेक स्थळे.[३]

ईश्वराने प्रकटीकरणाद्वारे सध्याच्या पृथ्वीच्या दुसऱ्या व शेवटच्या विनाशाबाबत सांगीतले की, दूत पृथ्वीचा संपूर्ण विनाश होईपर्यंतशेवटच्या चौदा पीडा पसरवतील.[४]

प्रकटीकरण ८:२, ९:२१ च्या मधून हे सांगते "आणि मी सात देवदूतांना देवासमोर उभे असलेले पाहिले. त्यांना सात कर्णे दिले होते. दुसरा देवदूत आला आणि वेदीजवळ उभा राहिला. या देवदूताकडे सोनेरी धुपाटणे होते, आणि राजासनाच्या समोर सोन्याच्या वेदीवर सर्व पवित्र जनांच्या प्रार्थनांसह धूप ठेवण्याकरिता त्याच्याजवळ पुष्कळ धूप दिला होता. धुपाचा धूर देवदूताच्या हातातून पवित्र जनांच्या प्रार्थनांसह देवासमोर वर चढला. मग देवदूताने धुपाटणे घेऊन, वेदीवरील अग्नीने ते भरले व ते पृथ्वीवर टाकले तेव्हा विजा चमकू लागल्या. मेघांचा गडगडाट व इतर आवाज झाले. आणि भूकंप झाला. मग ज्या सात देवदूतांजवळ कर्णे होते ते आपापले कर्णे वाजविण्यास सिद्ध झाले.

"पहिल्या देवदूताने कर्णा वाजविला आणि रक्तमिश्रित गारा व अग्नि उत्पन्न होवून त्यांची पृथ्वीवर वृष्टि झाली; तेव्हा पृथ्वीचा एक तृतीयांश भाग आणि एक तृतीयांश झाडे व सर्व हिरवे गवत जळून गेले.

दुसऱ्या देवदूताने त्याचा कर्णा वाजविला, तेव्हा अग्नीने जळत असलेल्या मोठ्या डोंगरासारखे काहीतरी समुद्रात टाकले गेले; आणि समुद्रातील एक तृतीयांश रक्त झाले. आणि समुद्रातील एक तृतीयांश जीव मेले. आणि एक तृतीयांश जहाजे नष्ट झाली.

"तिसऱ्या देवदूताने त्याचा कर्णा वाजविला तेव्हा मशालीप्रमाणे पेटलेला एक मोठा तारा आकाशातून पडला. तो तारा नद्यांच्या एक तृतीयांश भागावर पडला [आणि असे घडण्याआधी, ईश्वराचे हवाई सैन्य म्हणजे उडत्या तबकडया, ज्यांना सामान्यपणे युएफओ म्हटले जाते त्या पृथ्वीवरच्या सर्व भ्रष्टाचारावर लक्ष ठेवून होत्या आणि किळसवाण्या दुष्ट माणसांवर ईश्वरी कोपाचा वर्षाव करताना त्यांना आनंद मिळत होता.] आणि झऱ्यांच्या एक तृतीयांश भागावर पडला. त्या ताऱ्याचे नाव कडूदवणा आणि एक तृतीयांश पाण्याचा कडुदवणा झाला. आणि त्या पाण्याने पुष्कळ माणसे मेली कारण ते कडू झाले होते.

चौथ्या देवदूताने त्याचा कर्णा वाजविला; तेव्हा सूर्याच्या एक तृतीयांश भागावर आघात झाला. चंद्राच्या एक तृतीयांश भागावर व ताऱ्यांच्या एक तृतीयांश भागावर आघात झाला. त्यांचा तृतियांश अंधकारमय व्हावा आणि दिवसाच्या तसेच रात्रीच्याहि तृतीयांशात प्रकाश दिसू नये म्हणून असे झाले होते.

"मी पाहिले तेव्हा एक देवदूत अंतराळाच्या मध्यभागी उडताना दृष्टीस पडला; त्यास मोठ्याने असे म्हणताना मी ऐकले: जे तीन देवदूत कर्णा वाजवणार आहेत त्यांच्या कर्ण्यांच्या होणाऱ्या ध्वनीने पृथ्वीवर राहणाऱ्या लोकांवर अनर्थ, अनर्थ, अनर्थ येणार. [या धर्मग्रंथातून असे समजते की देवाच्या सर्व देवदूतांना-भविष्यात काय होणार आहे ते माहित आहे. पृथ्वीवरच्या वाईट, दुष्ट लोक मात्र अजूनही यावरून काहीही धडा शिकत नाहीत!].

"पाचव्या देवदूताने त्याचा कर्णा वाजविला, तेव्हा मी आकाशातून एका ताऱ्याला, पृथ्वीवर पडताना पाहिले. त्याच्याजवळ अथांग डोहाची किल्ली देण्यात आली. त्याने अथांग डोह उघडला तेव्हा मोठ्या भट्टीतून धूर यावा तसा त्या डोहातून धूर वर चढला. डोहातून येणाऱ्या धुरामुळे सूर्य आणि आकाश काळे झाले. मग धुरातून टोळ निघून पृथ्वीवर उतरले. त्यांना पृथ्वीवरील विंचवासारखी शक्ती देण्यात आली. टोळांना सांगण्यात आले होते की त्यांनी गवताला, कोणत्याही हिरवळीला किंवा झाडांना उपद्रव करू नये. तर, ज्या लोकांच्या कपाळावर देवाचा शिक्का मारण्यात आला नसेल त्यांना मात्र उपद्रव करावा. [लोक असे म्हणतात की नव्या करारापेक्षा जुन्या करारामध्ये ईश्वर अधिक रागीट आहे, हे विचित्र नाही का? इथे मात्र तसे दिसत नाही.] त्यांना जिवे मारण्याचे त्यांच्याकडे सोपविले नव्हते तर फक्त पाच महिने पीडा देण्याचे सोपविले होते; त्यापासून होणारी पीडा विंचू माणसाला नांगी मारतो तेव्हा त्याला होणाऱ्या पीडेसारखी होती. त्या दिवसात माणसे मरणाची संधी शोधतील तरी त्यांना मरण येणार नाही; मरण्याची उत्कंठा धरतील तरी मरण त्यांच्यापासून

---

३ जेन. १९ :१२-२५ ४ रेव.८:७-१३, ९:१-१९, ११:१९, १४:१५-२०, १५:१, ५-८, १६:१-१२, १७-२१

### झिंबाब्वे

प्रिय महोदय,

रेडिओ आफ्रिका टू या कार्यक्रमाने माझ्या समुदायातील अनेक जणांना आशेचा किरण दाखवला आहे. मी जेव्हा पहिल्यांदा हा कार्यक्रम ऐकला तेव्हा मी खूप भारावून गेलो आणि मी माझ्या कुटुंबियांना हा कार्यक्रम ऐकण्यासाठी बोलवले. तेव्हापासून आमचे जीवन पूर्ण बदलून गेले आहे. गॉस्पेलचा संपूर्ण आफ्रिकेमध्ये प्रसार केल्याबद्दल धन्यवाद. ईश्वर आपणास योग्य बक्षीस देईल अशी प्रार्थना करतो.

कृपया तुमच्या जवळ असलेले कुठलेही लेखी साहित्य असेल तर ते मला पाठवण्याची कृपा करावी. त्यामुळे माझी अध्यात्मिक प्रगती होण्यास मदत होईल.

आपला आभारी,

विन्स्टन टांबवाड — बुलावायो, झिंबाब्वे

दूर पळेल. [जुन्या करारामध्ये मरण कधीही अशा भयानक पद्धतीने देण्यात आले नव्हते. विचार करा – तुम्ही याच्या बाजुने किंवा याच्या विरूद्ध मत देवू शकत नाही कारण ईश्वर महान हुकुमशहा आहे, तो नेहमीच कार्यालयात असणार आहे, जगातील लोकांना ते आवडो अथवा न आवडो. यात राजकिय अचूकता नाही आणि लोकशाही नाही केवळ धर्मसत्ता!] युद्धासाठी तयार असलेल्या घोड्यांसारखे टोळ दिसत होते. त्यांच्या डोक्यांवर त्यांनी सोनेरी मुगुटासारखे काही घातले होते. त्यांचे चेहरे मनुष्यांच्या चेहऱ्यासारखे दिसत होते. त्यांचे केस स्त्रियांच्या केसांसारखे होते. त्यांचे दात सिंहाच्या दातांसारखे होते. त्यांस उरस्त्राणे होती जी लोखंडी चिलखतासारखी दिसत होती आणि त्यांच्या पंखांचा आवाज युद्धात वेगाने धावणाऱ्या अनेक घोडयांच्या रथासारखा होता. त्यांना विंचवासारख्या शेपट्या व नांग्या होत्या. लोकांना पाच महिने वेदना देण्याची त्यांच्या शेपटीत ताकद होती. टोळांचा एक राजा होता. हा राजा

## मिसौरी

प्रिय बंधु भगिनींनो,

ईश्वराच्या नावे आपणास अनेक शुभेच्छा! ईश्वराच्या कृपेने तुम्ही सर्वजण कुशल असाल अशी आशा आहे. ईश्वरकृपेने मी सुरक्षित आहे. आपण मला लेखी साहित्य पाठवल्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. पॅस्टर टोनी अलामो यांची साक्ष "कोरडया अस्थी" खूपच वाचनीय आहे. श्रीमंतीचे आणि प्रसिध्दीचे आयुष्य सोडून तो जिवंत ईश्वराची सेवा करण्यासाठी त्याने श्रीमंती आणि प्रसिद्धीचा त्याग केला हे खूप उल्लेखनीय आहे.

जर त्यांच्यासारखी आणखी काही माणसे असती तर या देशाची स्थिती नक्कीच चांगली असली असती. पॅस्टर अलामो हे खरोखरच एक महान देशभक्त आहेत. मला त्यांच्याबद्दल अजून काही जाणून घ्यायला आवडेल. आपण त्यांच्या-बद्दल आणखी लेखी साहित्य पाठवले तर बरे होईल. आपण जे काही करत आहात त्याबद्दल आभारी आहोत.

आपला,
रिचर्ड बाऊंड्स बोन टेरी, एम.ओ




अथांग डोहाचा दूत होता. यहूदी भाषेत त्याचे नाव अबद्दोन, आणि ग्रीक भाषेत त्याचे नाव अपुल्लोन (विध्वंसमूलक) होते.

"पहिला अनर्थ होवून गेला आहे; पहा, ह्यानंतर आणखी दोन अनर्थ होणार आहेत. नंतर सहाव्या देवदूताने त्याचा कर्णा वाजविला. तेव्हा मी देवासमोर असलेल्या सोनेरी वेदीवरील चार शिंगामधून झालेली एक वाणी मी ऐकली;

ज्याच्याकडे कर्णा होता त्या सहाव्या दूताला ती वाणी म्हणाली, "फरात (युफ्रेटस) नदीवर बांधून ठेवलेले चार देवदूत मोकळे कर." पृथ्वीवरील एक तृतीयांश लोकांना मारण्यासाठी नेमलेली घटिका दिवस, महिना व वर्ष ह्यासाठी तयार केलेले हे चार देवदूत सोडण्यात आले. घोडदळाची संख्या वीस कोटी होती; ही त्यांची संख्या मी ऐकली. माझ्या दृष्टान्तात मी घोडे आणि घोड्यांवर असलेले स्वार पाहिले, ते अशाप्रकारे दिसत होते: त्यांस अग्नि, नीळ व गंधक ह्यांच्या रंगांची उरस्त्राणे होती. घोड्यांची मस्तके सिंहाच्या मस्तकासारखी दिसत होती; घोड्यांच्या तोंडांतून अग्नि, धूर व गंधक येत होते. घोडयांच्या तोंडातून येणाऱ्याया तीन पीडा - अग्नि, धूर व गंधक यामुळे पृथ्वीवरील एक तृतीयांश लोक मारले गेले. [आज पृथ्वीवर सात अब्ज लोक आहेत तसेच त्यावेळेस असतील तर आणि या अनर्थामुळे त्यापैकी एकतृतीयांश मारले गेले असतील तर आतापर्यंच्या इतिहासामध्ये एकावेळी मारल्या गेलेल्या लोकांचा हा सर्वात मोठा आकडा असेल. तरीही, नोहाच्या काळांत, पूरामध्ये किती लोक मेले हे आपल्याला माहित नाही.... मात्र, आपल्याला हे माहित आहे की नोहा व त्याच्या कुटुंबातील व्यक्ती असे एकूण आठ व्यक्ती वगळता कोणीही या पुरातून वाचू शकले नाही.[५]] घोड्यांची शक्ति त्यांच्या तोंडात तशी त्यांच्या शेपटीतसुद्धा होती. त्या शेपट्या सापासारख्या असून त्यांना दंश करण्यासाठी डोके होते. ते लोकांना उपद्रव करीत असत. त्या पीडांमुळे जे मारले गेले नाहीत अशा बाकीच्या माणसांनी आपल्या हातच्या कृत्यांविषयी पश्चात्ताप केला नाही; म्हणजे सैतानांची व ज्यास पाहता, ऐकता व चालता येत नाही अशा सोन्याच्या, रुप्याच्या, पितळेच्या, दगडाच्या व लाकडाच्या मूर्तींची पुजा करणे त्यांनी सोडले नाही. आणि त्यांनी केलेल्या नरहत्या, चेटके, जारकर्म व चोऱ्या ह्याबद्दलही पश्चात्ताप केला नाही."

प्रकटीकरण ११:१४-१९: "दुसरा अनर्थ होवून गेला आहे. पाहा तिसरा अनर्थ लवकर होणार आहे. सातव्या देवदूताने त्याचा कर्णा वाजविला. तेव्हा स्वर्गात मोठ्याने आवाज झाले. ते आवाज म्हणाले: जगाचे राज्य आता आमच्या प्रभुचे व त्याच्या ख्रिस्ताचे झाले आहे. आणि तो युगानु-युगे राज्य करील. तेव्हा देवासमोर आपल्या आसनांवर बसलेले चोवीस वडील उपडे होवून देवाला नमन करून म्हणाले:

सर्वसमर्थ प्रभु देवा, तूच एक आहेस की जो तू आहेस व होतास, तुझे महान सामर्थ्य वापरुन सत्ता चालविण्यास सुरुवात केलीस म्हणून आम्ही तुझे आभार मानतो. राष्ट्रे क्रोधाविष्ट झाली; तुझ्या क्रोधाची वेळ आली आता मेलेल्या माणसांचा न्याय करण्याची वेळ आली आहे. तुझे सेवक, दूत, यांना बक्षीस देण्याची वेळ आली आहे. आणि तुझ्या पवित्र लोकांना बक्षिस देण्याची वेळ आली आहे. जे लहानथोर लोक तुझ्या नावाची भिती बाळगतात, त्यांना बक्षिस देण्याची वेळ आली आहे. जे पृथ्वीचा नाश करतात, त्यांचा नाश करण्याची वेळ आली आहे. मग देवाचे स्वर्गातील मंदिर उघडण्यात आले. तेव्हा तेथे कराराचा कोश दिसला आणि विजा चमकू लागल्या. गोंगाट, गडगडाट, भूकंप व गारपीट झाली"

ईश्वराचे हवाई सैन्य म्हणजे उडत्या तबकडया आता, मानवी कृत्यांबाबतचा अंतीम निर्णय देण्यासाठी पृथ्वीवर नजर ठेवून आहेत. तुम्हाला वाटत असेल तर खुशाल हसा, पण या उडत्या तबकडया म्हणजे खरोखरच ईश्वराचे देवदूत आहेत. लाखो लोकांनी त्यांना पाहिले आहे आणि ते काही इतर ग्रहावरून आलेले नाहीत. जेव्हा जेव्हा ईश्वर काही निर्माण करतो, सैतान त्याची हुबेहुब प्रतिकृती करून तशीच दुसरी निर्मिती करायचा प्रयत्न करतो. परंतु सैतानाला त्याची हुबेहुब प्रतिकृती करता येणे अशक्य आहे. सैतान उडत्या तबकडयांचा आभासी दृष्टांत पाठवतो. त्या तबकडया चालवणाऱ्या राक्षसांना बेढब शरीर व खूप मोठे डोके असल्याचे दाखवतो. ईश्वराच्या देवदुतांनी ईश्वराला आणि ईश्वराच्या शासनाला – जे वन वर्ल्ड गवर्नमेंट, युनायटेड नेशन्स किंवा न्यु वर्ल्ड ऑर्डर नाही - विरोध करणाऱ्या सर्व लोकांसह पृथ्वी नष्ट करण्यापूर्वी ईश्वर त्याची हवाई सेना त्यास्थळी पाठवतो या वस्तुस्थितीची तुम्ही चेष्टा उडवावी यासाठी

*(पान ४ वर पुढे सुरू)*

५ जेन. ७:११-२३, १ पीट. ३:२०

## स्वर्गात घडणारी आश्चर्ये आणि त्यांच्या पृथ्वीवर दिसणाऱ्या खुणा

*(पान ३ वरून पुढे सुरु)*

या खोट्या प्रतिकृती तयार केल्या जातात. न्यु वल्ड ऑर्डर सैतानाचे शासन आहे. रोममधील खोट्या प्रेषिताद्वारे श्वापदावर अमल चालवला जातो आणि त्याच्यावर सैतानाच्या आत्म्याचे नियंत्रण असते.[६] व्हॅटिकन हे सैतानाचे स्थान.[७] ईश्वराने इतर कोणत्याही गृहावर माणसे किंवा दुसरे कोणतेही जीव तयार केले नाहीत. त्याने इतर गृहावर जीव निर्माण केले आहेत असे जर लोक समजत असतील तर तो त्यांचा मुर्खपणा आहे!

१६:२१ द्वारे, प्रकटीकरण १५:५मधून असे सांगीतले आहे की, "नंतर मी पाहिले तेव्हा साक्षीच्या मंडपाचे स्वर्गातील मंदिर उघडले:

आणि [अंतिम] सात पीडा आणणारे सात देवदूत मंदिराबाहेर आले. त्यांनी स्वच्छ चमकदार तागाचे कपडे घातले होते. त्यानी त्यांच्या छातीवर सोन्याच्या पटूया बांधल्या होत्या. मग सात देवदूतांना चार [स्वर्गातील] प्राण्यांपैकी एकाने सात सोनेरी वाट्या दिल्या. युगानुयुगे जिवंत असणाऱ्या देवाच्या क्रोधाने त्या वाट्या भरल्या होत्या. आणि देवाच्या तेजामधून व पराक्रमामधून निघालेल्या धुराने मंदिर भरले. आणि कोणीही सात देवदूतांच्या [अंतिम] सात पीडा संपेपर्यंत मंदिरात प्रवेश करु शकले नाही. मग मी मंदिरातून एक मोठा आवाज ऐकला. तो सात देवदूतांना म्हणाला, जा, पृथ्वीवर देवाच्या रागाच्या सात वाट्या ओता. पहिला देवदूत गेला आणि त्याने जमिनीवर त्याची वाटी ओतली. तेव्हा सर्व लोकांना ज्यांच्यावर श्वापदाचे चिन्ह होते आणि जे त्याच्या प्रतिमेची पूजा करीत होते त्यांना अतिशय कुरुप आणि वेदना देणारे फोड आले.

"दुसऱ्या देवदूताने त्याची वाटी समुद्रावर ओतली. मग समुद्र मेलेल्या माणसाच्या रक्तासारखा झाला. समुद्रातील प्रत्येक जीवधारी प्राणी मेले.

तिसऱ्या देवदूताने त्याची वाटी नद्या व झऱ्यांवर ओतली. तेव्हा नद्या व झऱ्यांचे रक्त झाले. मग मी पाण्याच्या देवदूताला हे बोलताना ऐकले, जो तू आहेस व होतास जो तू पवित्र आहेस आणि राहशील त्या तू असा न्यायनिवाडा केला म्हणून तू न्यायी आहेस. लोकांनी तुझ्या पवित्र लोकांचे रक्त सांडले. तुझ्या दूतांचे रक्त सांडले. आता तू त्या लोकांना रक्त प्यावयास दिले आहेस. कारण ते याच पात्रतेचे आहेत. त्यानंतर मी वेदीमधून एकाला असे बोलताना ऐकले की, प्रभु देवा सर्वसमर्था, तुझा न्याय खरा आणि योग्य आहे.

चौथ्या देवदूताने त्याची वाटी सूर्यावर ओतली. त्याला लोकांना अग्नीने करपवून टाकण्याची शक्ती दिली होती. भयंकर अशा उष्णतेमुळे लोक करपून गेले. त्या पीडांवर ज्याला ताबा आहे त्या देवाच्या नावाची लोकांनी निंदा केली. पण लोकांनी पश्चात्ताप करण्याचे नाकारले व देवाचे गौरव करण्याचे नाकारले.

पाचव्या देवदूताने त्याची वाटी श्वापदाच्या सिंहासनावर [रोमच्या व्हॅटिकनवर] ओतली. आणि श्वापदाच्या राज्यावर अंधार पसरला. वेदनांमुळे लोक त्यांच्या जिभा चावत होते. त्यांना वेदना होत होत्या व फोड आले होते. त्यामुळे त्यांनी स्वर्गाच्या देवाची निंदा केली आणि आपल्या कृत्यांबद्दल पश्चात्ताप केल नाही. (अगदी आजच्याप्रमाणे)

सहाव्या देवदूताने त्याची वाटी फरात नदीवर ओतली. आणि पूर्वेकडून येणाऱ्या राजांसाठी रस्ता तयार व्हावा यासाठी नदीतील पाणी आटून गेले.

तेव्हा मी तीन अशुद्ध आत्मे जे बेडकासारखे दिसत होते ते पाहिले. ते ड्रॅगनच्या (सैतान) मुखातून बाहेर आले.

श्वापदाच्या (ख्रिस्तविरोधी, एक जगत शासन, युएन, रोममधील न्यु वल्ड ऑर्डरचे मुख्यालय म्हणजेच व्हॅटिकन) मुखातून बाहेर आले, खोट्या दूताच्या (व्हॅटिकन रोमन कॅथलिक पंथ) मुखातून बाहेर आले. कारण ते सैतानाचे आत्मे आहेत, ते चमत्कार दखवतात, ते पृथ्वीवरील सर्व राजांकडे जातात व त्यांना सर्वसमर्थ देवाच्या मोठ्या दिवसाच्या लढाईसाठी एकत्र जमवतात.

"पाहा, जसा चोर येतो तसा मी येईन. आपण नग्न असे चालू नये. आपली लज्जा लोकांसमोर दिसू नये म्हणून जो जागा राहील आणि आपले कपडे [त्याची मुक्ती[८]] तयार ठेवतो तो धन्य. मग दुष्ट आत्म्यांनी इब्री भाषेत ज्याला हर्मगिदोन म्हटले जाते त्याठिकाणी सर्व राजांना एकत्र आणले. मग सातव्या देवदूताने त्याची वाटी हवेत ओतली. तेव्हा स्वर्गाच्या मंदिरातून सिंहासनाजवळून मोठा आवाज आला. तो म्हणाला, झाले मग विजा चमकू लागल्या. गोंगाट, गडगडाट व फार प्रचंड भूकंप झाला. लोक पृथ्वीवर असल्यापासून असला प्रचंड भूकंप कधी झालाच नव्हता. महान शहर तीन भागात विभागले गेले. राष्ट्रांतील शहरे कोसळली: आणि देव महान बाबेलला विसरला नव्हता. त्याने त्यांच्या भयंकर रागाच्या द्राक्षरसाचा पेला बाबेलला दिला. प्रत्येक

६ डॅन.२:४०, ७:१९-२५, १२:१,रेव.१३:२-८, १४:८, १६:१३-१४, १९-२०, १७:१-९, १८:२-२४ ७ रेव. १३:१-१२, १७:१-९

८ मॅथ्यू. ८:१०-१२,१३:३७-४३, ४७-५०, २२:८-१४, २४:४२-५१, २५:१-१३, ल्युक ९ : २३-२६,६२, १२:३५-४८,१४ :१५1-३५, रोम. ८:३५-३९, २कोर. ५ :१-४,रेव. ३:१-३, ८-२२

## टोगो

(फ्रेंचमधून अनुवादित)

टोनी अलामो मिनिस्ट्रीमधील प्रिय पॅस्टरना माझा नमस्कार. २३ फेब्रुवारी, २०१३ रोजी मला एक पार्सल मिळाले. त्यात फ्रेंच बायबलच्या तीन प्रति, पाच मसिहा पुस्तके, दोन टी-शर्ट आणि लेखी साहित्याच्या हजारो प्रति होत्या. हे साहित्य जिथे पोहोचणे जरुरी आहे तिथे लवकर पोहोचवण्यासाठी आम्ही आवश्यक ते प्रयत्न करू. टोगोमधील माझे सहकारी, त्यांच्या शुभेच्छा आपणांस देण्यास आणि आत्म्याच्या मुक्तीसाठी आपल्या सद्भावनेद्दल धन्यवाद देण्यास सांगत आहेत.

येशू ख्रिस्ताचे आशिर्वाद आपणा सर्वांना लाभोत, आमेन! इथे टोगोमध्ये आमच्या खूप साऱ्या गरजा आहेत. शक्य असल्यास आम्हाला फ्रेंच बायबल गॉस्पेल साहित्य आणखी मोठया प्रमाणांत पाठवत रहा कारण ते साहित्य मिळाल्याबरोबर लोक त्वरेने त्याची मागणी करतात व ते संपून जाते. लोकांना टोगो येथील, पाद्री अलामो, यांचे ख्रिस्ती साहित्य अजूनही खूप वाचावेसे वाटते. लोकांना वाचण्यासाठी भरपूर साहित्य हवे आहे, टोगोमधील अलामो पॅस्टरंचे गॉस्पेल साहित्य. द मसिहा हे पूस्तक वाचून अनेक वाचक आपले जीवन येशू ख्रिस्ताच्या सेवेत समर्पित करायला तयार झाले आहेत.

सौजन्यपूर्ण आपला,

अचाउ कोकुऊ

टोगो अलामो मिनिस्ट्री, टोगो.

बेट पळून गेले. आणि पर्वत पूर्णपणे नष्ट झाले. लोकांवर आकाशातून गारांचा वर्षाव झाला. या प्रत्येक गारा सुमारे १०० पाउंड वजनाच्या होत्या, या गारांच्या पीडांमुळे लोकांनी देवाची निंदा केली कारण ही पीडा खरोखरच महाभयंकर होती." (प्रकटीकरण १६:१४-२१)

ख्रिश्चन राज्य तसेच जगातील सर्वसामान्य जनतेला, अदृश्य राज्याबाबत, देवदूतांच्या राज्याबाबत माहीती होण्याची खूप गरज आहे. देवदूत चांगल्या व वाईट अशा दोन्ही प्रकारचे असतात. चांगले देवदूत हे ईश्वराचे दूत असतात आणि त्यांना "पहारेकरी" असे म्हटले जाते. ते तुमच्या व आमच्या प्रत्येक कृतीकडे लक्ष ठेवून असतात आणि तुम्ही व आम्ही बोलत असलेला प्रत्येक शब्द ते ऐकत असतात.

उत्पत्तिमध्ये, कुटुंबप्रमुख, अब्राहमने त्याच्या सेवकाला आज्ञा दिली की त्याने अब्राहमचे मूळ गाव, मेसोपोटेमिया येथे जाऊन त्याचा मुलगा आयझॅकसाठी वधू शोधून आणावी. त्याने आपल्या सेवकाला म्हटले, "स्वर्गीच्या ज्या परमेश्वर देवाने मला माझ्या बापाच्या घरातून, माझ्या जन्मभूमीतून आणले आणि मला शपथपूर्वक सांगितले की हा देश मी तुझ्या संततीला देईल. तो तुझ्यापुढे आपला दूत [त्याचा पहारेकरी] पाठवील आणि तू तेथूनच माझ्या मुलासाठी नवरी आण. (उत्पत्ति २४:७) आणि ईश्वराने त्याच्या देवदूताला, त्या सेवकाच्या अगोदर पाठवले, सेवकाला बेथुएलची दहा वर्षाची कन्या रिबेका आढळली द बुक ऑफ जेशेर प्रकरण २४, श्लोक ४० नुसार तिचे वय दहा वर्षे होते. आणि द बुक ऑफ जेशेर प्रकरण २४, श्लोक ४५ नुसार, आयझॅकचे वय ४० वर्षे होते. उत्पत्ति २५:२० मध्ये देखील याची पुष्टी केली आहे. रिबेकाला आयझॅकद्वारे इस्त्राएल जन्माला आला. तिने इसाऊ आणि जेकब या दोघांना जन्म दिला. महानियम येथे जेकबची ईश्वरासोबत झालेल्या मल्लयुद्धामध्ये सरशी झाली तेव्हा ईश्वराने जेकबचे नाव बदलून त्याला इस्त्राएल असे नाव दिले (उत्पत्ति ३२:२४-२८)

ईश्वराच्या दूताने इस्त्राएल राष्ट्राला तांबड्या समुद्रातून कोरड्या जागेवर नेले, आणि या घटनेपूर्वी, ईश्वराचा दूर इजिप्शियन लोकांची छावणी व इस्त्राएल देशाच्या मध्ये आला व इस्त्राएल या देशाच्या मागे गेला. (एक्सोडस १४:१५-२०).

उत्पत्ति १९:१ मध्ये सांगितले आहे, "त्या दिवशी संध्याकाळी ते दोन देवदूत सदोम नगरात आले." उत्पत्ति १९:१२-१३ मध्ये सांगितले आहे, ते दोन पुरुष (देवदूत) लोटला म्हणाले, "तुझ्या कुटुंबातील व नात्यातील इतर कोणी लोक म्हणजे तुझे जांवई, मुलगे, मुली किवां इतर नातेवाईक या नगरात आहेत काय? तसे कोणी असतील तर त्यांना आता ताबडतोब या स्थानातून बाहेर काढा: कारण आम्ही (दूत) या नगराचा नाश करणार आहोत. हे नगर किती वाईट आहे ते परमेश्वराने ऐकले आहे आणि म्हणून त्याने आम्हाला या नगराचा नाश करण्यासाठी पाठवले आहे." सोडोम आणि गोमराह आणि त्याच्या आजूबाजूची शहरे नष्ट करण्यासाठी केवळ दोन देवदूत होते (उत्पत्ति १९:१२-२९) आणि सेन्नाचेरिबने जेव्हा आपले सैन्य किती शूर आणि सामर्थ्यशाली आहे असे इस्त्रायलला गर्वाने सांगीतल्यानंतर संपूर्ण सैन्य नष्ट करण्यासाठी फक्त एकच देवदूत पुरेसा होता. २ राजे १९:३५ मध्ये सांगितले आहे की, "त्या रात्री असे झाले की, परमेश्वराचा दूत बाहेर पडला [एक देवदूत] आणि त्याने अशुरांच्या छावणीतली एक लक्ष पंच्याऐंशी हजार [१८५,०००]: माणसे मारली. सकाळी लोक उठून पाहतात तर सर्वत्र प्रेतांचा खच पडलेला."

केवळ एका देवदूताने संपूर्ण इजिप्तच्या सैन्याला नष्ट करुन टाकले आणि एका देवदूताने सेन्नाचेरिबच्या पूर्ण सैन्याचा नाश केला.

सात देवदूत संपूर्ण पृथ्वीला नष्ट करून टाकतील. शेकडो युएफओ, ईश्वराच्या देवदूतांनी चालवलेल्या उडत्या तबकडया नजरेला पडल्यास लोकांनी किती घाबरायला पाहिजे?

उडत्या तबकडया म्हणजे न्यूयॉर्क, न्यू जर्सी, न्यू ऑर्लिन्स, लुईसियाना, जॉपलिन, मिस्सूरी, हैती, इंडोनेशिया व आणि जपान ही ठिकाणे नष्ट करण्यासाठी दिलेले धोक्याचे इशारे आहेत. ते जगभरातील शेकडो अन्य ठिकाणे नष्ट करायलाही निघाले आहेत. ईश्वर जगांतील विविध ठिकाणे आणि मानवजात नष्ट करण्यासाठी त्याचे देवदूत पाठवत आहे.

मत्तय २४:२१-२२ मध्ये सांगितले आहे, "कारण त्याकाळी फार पीडा येतील. जगाच्या आरंभापासून कधीही झाली नाही आणि पुन्हा कधी होणार नाही अशी पीडा त्या काळी भोगावी लागेल. आणखी, देवाने ते दिवस

*(पान ८ वर पुढे सुरू)*

## लचलान जॉन्सन यांची साक्ष



*हर्मानो लचलान जॉन्सन*

मी ऑस्ट्रेलियामध्ये जन्मलो आणि मोठा झालो. माझे आईवडील धार्मिक वृत्तीचे नव्हते व निश्चितच ख्रिश्चन नव्हते. मला ख्रिश्चन धर्माबद्दल कधीही शिकायला मिळाले नाही. मी अपुऱ्या दिवसांचा जन्मलो आणि तरीही जिवंत आहे त्यामुळे मी स्वत:ला भाग्यशाली समजतो. मला थोडया प्रमाणांत सेरेब्रल पालसी(मेंदूचा विकार) आणि स्नायूंच्या विकाराची लागण झालेली होती. मी तेव्हा अगदी लहान होतो आणि माझ्या मित्राच्या घरी होतो. हे खूप ठळक आहे परंतू माझ्या स्वर्गातील दूरच्या घरी जाईपर्यंत मला ते पूर्णत: आठवणार नाही.....

माझ्या मित्राकडे मुलांसाठी असलेले चित्ररुपातले बायबल कॉमिक होते. त्यामध्ये माझ्यासारखा एक लहान मुलगा होता. त्याला कारने उडवले होते. तो सायकल चालवत होता आणि ईश्वर त्याला बरे करणार होता की नाही हे मला आठवत नाही, पण परंतु त्या पुस्तकाच्या पानावर कोपऱ्यात येशू ख्रिस्ताची आकृती दाखवलेली होती. मी म्हटल्याप्रमाणे, हे ठळक होते, आणि ईश्वराने मला जाणीव करून दिली की सर्व काही ठिक होणार आहे. तो मुलगा जर बरा झाला असता तर खूपच छान झाले असते. आणि जरी त्याला मृत्यू आला असता तरी तो स्वर्गात गेला असता. दोन्ही परिस्थितींमध्ये त्याचा लाभच झाला असता.त्या क्षणी मला जाणीव झाली की येशू ख्रिस्त हाच मार्ग, सत्य आणि जीवन आहे.त्यामुळे मला पुनर्जन्माचा अनुभव नसला तरीही, मला असे वाटले आणि मी म्हणालो की मी ख्रिश्चन होतो.

माझ्या पालकांनी एका नवीन राज्यांत स्थायिक व्हायचे ठरवले, जिथे माझ्या वडिलांचा जन्म झाला होता. त्यानंतर

*(पान ६ वर पुढे सुरू)*

# लचलान जॉन्सन यांची साक्ष

(पान ५ वरून पुढे सुरू)
लवकरच माझ्या आईवडीलांचा घटस्फोट झाला. माझ्या वडिलांना असे वाटले की माझ्या आईने माझा संभाळ केल्यास मला चांगले वातावरण मिळणार नाही. म्हणून त्यांनी मला एका बोर्डिंग स्कूलमध्ये ठेवले. मला हे खूप अवघड गेले कारण मला आईपासून लांब जावे लागले आणि त्या शाळेची शिस्त सैनिकी शाळेप्रमाणे कडक होती.

ही शाळा श्रीमंतांच्या मुलांसाठी असलेली एक खासगी शाळा होती. माझ्या आईला वाटले होते की ती शाळा माझ्यासाठी चांगली ठरेल त्यामुळे मी तिथे राहिलो. मी ख्रिश्चन आहे असे मी साऱ्यांना सांगत असे आणि जरी मी कोणतीतरी पाप्याची प्रार्थना म्हणत असे, तरी मला वाचवण्यासाठी कोणीच मदत केली नाही. ते किंग जेम्सचे बायबल मात्र वाचत होते आणि आम्ही संगीताच्या साथीवर श्लोक म्हणत असू. ज्या लोकांनी ते ख्रिश्चन असल्याचे कधीही भासवले नाही, मी त्यांच्यापेक्षा कितीतरी अधिक वाईट पापे करत होतो. ते पुनर्जन्माबद्दल बोलत नव्हते, ईश्वराच्या पवित्र आत्म्याच्या मागे जाण्याबद्दल बोलत नव्हते. तो एक सुसंघटित धर्म होता. कोणत्याही विद्यार्थ्याने ते ख्रिश्चन आहेत असे म्हटले तर —तो जीवन बदलवून टाकणारा अनुभव नव्हता तर केवळ एका खूळ असल्यासारखा अनुभव होता. म्हणून मी शाळा सोडली. या शाळेतले माझे काही मित्र ऑस्ट्रेलियातील वेगाने वाढणाऱ्या चर्चमध्ये जात होते, परंतू ते मोठ्या चर्चपैकी एक होते कारण . कारण या चर्चमध्ये तुम्ही ईश्वराला भिले पाहिजे किंवा त्याच्या आज्ञावचनांचे पालन केले पाहिजे अशी शिकवण दिली जात नव्हती. तिथे “ख्रिश्चन” बास्केटबॉल होता, “ख्रिश्चन सर्फ बोर्डिंग” होते आणि युथ ग्रुप देखील होता. त्यामुळे मी चर्चमध्ये जाऊ लागलो, परंतू अनेक चुकीच्या कारणांसाठी आणि उरलेला आठवडाभर मला हवे ते करण्यासाठी. म्हणून मी ही त्या चर्चमध्ये जाऊ लागलो. त्यानी पापाच्या तीव्रतेबद्दल कधीही प्रवचन दिले नाही. तुम्ही वेगळे असायला पाहिजे, पवित्र असायला पाहिजे किंवा जगापासून वेगळे असायला पाहिजे या मुद्द्यावर कधीही जोर दिला नाही.

चर्चच्या संकल्पनेनुसार साक्ष देणे म्हणजे आधी तुमच्या कामामध्ये किंवा व्यवसायामध्ये यशस्वी होणे आणि मग जेव्हा तुम्हाला शक्य होईल तेव्हा साक्ष देणे होय. मी चुकीच्या लोकांच्या सहवासांत आलो, आणि चर्चमधील या लोकांच्या मत होते की, आयुष्यभर मेहनत करण्यात काही अर्थ नाही, आताच मजा केली पाहिजे. म्हणून मग मी नोकरी सोडली. त्यामुळे माझ्या पालकांना खूप राग आला. असेच काही दिवस गेले व त्यानंतर मग मी बदल म्हणून अमेरिकेला यायचे ठरवले.ते १९८६ सालचा ख्रिसमसचा कालावधी होता. मी इथे आलो आणि केवळ इकडेतिकडे प्रवास केला. मी खूप अध:पाती होत चाललो होतो आणि सर्व प्रकारची पापे करत होतो. तरीही मी म्हणत होतो की मी ख्रिश्चन आहे. हे असे तीन महिने चालले.

मी तेव्हा मियामी येथे होतो, जिथे पॅस्टर अलामो यांचे चर्च आहे. त्या दिवशी समुद्रकिनाऱ्यावर भटकून परत येत होतो व माझ्या हातात बिअरची बाटली होती. आणि रस्त्यावर ख्रिश्चन मिनिस्ट्रीचे दोन बंधू हरवलेल्या आत्म्यांचा शोध घेत होते. ते माझ्याकडे आले व त्यांनी विचारले की मी ख्रिश्चन आहे का मी होय म्हटले. त्यांनी मला विचारले की, “तू ईश्वराच्या सर्व आज्ञावचनांचे पालन करतोस का?” मला “नाही” म्हणावे लागले. त्यांनी मला म्हटले की तुझी अशी पापे तुला नरकाच्या अग्नींत घेऊन जातील.... हे सारे मला काल घडल्यासारखेच आठवत आहे. त्यांनी मला विचारले की तुला चर्चमध्ये सेवा करण्यासाठी यायचे का, म्हणून मी त्यांच्यासोबत सेवेसाठी गेलो. ही सेवा एका छोटया साध्या घरामध्ये होती,- खूप मोठे घर नव्हते.

मी माझे जीवन ईश्वराला समर्पित करायचे ठरवले. सेवेनंतर मला खूप स्वच्छ झाल्यासारखे वाटले. या मिनिस्ट्रीबाबतची

## झांबिया

प्रिय बंधूनो,

येशू ख्रिस्ताच्या, आपल्या मसिहाच्या नावे आपणास अभिवादन. माझे कुटुंब, भक्तगण आणि मी आनंदात आहोत. आपण सर्व खुशाल असाल अशी प्रार्थना करतो. पॅस्टर टोनी अलामो यांना आरोग्य व ईश्वराचे संरक्षण लाभो यासाठी मी प्रार्थना करतो. आपण पाठवलेले पार्सल मला शुक्रवारी मिळाले. आपल्या मदतीबद्दल आभारी आहे. येशू ख्रिस्त हा सैध्दांतिक आणि व्यावहारिक ख्रिश्चनतेचा मुख्य आधार आहे.

पवित्रीकरण आणि समर्थनच्या योग्य ज्ञान प्राप्तीसाठी, ख्रिस्ताबाबतचे योग्य ज्ञान असणे अत्यावश्यक आहे. केवळ येशू ख्रिस्ताचे नाव घेतल्यासच आपल्याला चिरंतन आनंदाच्या प्रवेशद्वारातून प्रवेश मिळू शकतो. जर आपण केवळ आपलेच नाव घेऊन त्या प्रवेशद्वारापाशी आलो तर, आपण हरवून जाऊ, आणि आपल्याला त्या प्रवेशद्वारातून आत प्रवेश मिळणार नाही. आपण व्यर्थच दार ठोठावत राहू. आपण जर येशूच्या नावाने आलो, तर तो पासपोर्ट आहे आणि आपणास प्रवेश मिळेल आणि आपण जगाल. केवळ ख्रिस्ताच्या रक्ताची खूण आपल्याला विनाशापासून वाचवू शकते. रविवारी, मी चिंगाला जिल्ह्यातील, बायबल वे मिनिस्टरीजमध्ये प्रवचन दिले. मी जोशुआ १:१-९ मधील “धैर्यवान आणि सामर्थ्यशाली व्हा” असा संदेश दिला. भक्तगण धर्मोपदेश ऐकायला उत्सुक होते. सेवेनंतर मी पॅस्टर अलामो गॉस्पेल साहित्य तीन ठिकाणच्या चार चर्चमध्ये वाटले. गॉस्पेल साहित्य मिळाल्यावर पॅस्टर आनंदी झाले. या साहित्यामध्ये येशू ख्रिस्ताच्या माध्यमातून मुक्तीची योजना सांगितली आहे.

दरम्यान, पॅस्टर लेझरस कुलूलु नगोसा फार्म नावाच्या ग्रामीण भागांत प्रवचन देण्यास गेले जेथे बायबल वे मिनिस्टरीची आणखी एक चर्च आहे. तिथे त्यांनी गॉस्पेल साहित्याचे देखील वाटप केले, मात्र त्याची मागणी अजूनही आहे.

ईश्वराच्या दयेने जर आपणाकडे संसाधने असतील तर सोलवेझी रोडवरील चर्चना मदत करण्यासाठी आणखी गॉस्पेल साहित्य पाठवावे. आपल्या मदतीकरता मी नेहमीच आपला आभारी राहीन. तुमच्या गॉस्पेल साहित्याने अनेकांची अंत:करणं जिंकली आहेत. भक्तगणांना माझ्या शुभेच्छा कळवा. आपण मला लवकरच उत्तर पाठवाल अशी अपेक्षा आहे.

ख्रिस्त सेवेतील आपला सहकारी,
आयसन पोलेनी कॉपरबेल्ट,
झांबिया

ताजा कलम: मी उरलेले गॉस्पेल साहित्य पॅस्टर मॉरल मुसोंडा यांचेकडे नेले, जे वुसाकाईल आणि चांबोलीच्या वसाहतींमध्ये कार्य करत आहेत. या कृतीमुळे अधिकाधिक लोकांचे ख्रिस्त धर्माच्या बाजूने मन वळत आहे. त्यामुळे अनेक लोकांचे आत्मे ख्रिस्ताकडे वळत आहेत.

एक अतिशय चांगली गोष्ट म्हणजे, त्यांनी मला सांगीतले कि जर मी या मिनिस्ट्रीमध्ये दाखल झालो, तर माझ्या सर्व गरजा भागवल्या जातील. मला अशाप्रकारच्या चर्चच्या वातावरणाची गरज होती हे ईश्वराला माहीत होते, कारण मी जर इथे आलो नसतो तर मी अशा लोकांपैकी असलो असतो जे पाप्याची प्रार्थना म्हणतात आणि परत पापे करतात.

तो१९८७चा एप्रिल महिना होता आणि तेव्हापासून मी या मिनिस्ट्रीमध्ये काम करत आहे. मिनिस्ट्रीमध्ये मी अनेक सेवांसाठी गेलो आहे, संपूर्ण देशभर प्रवास करून प्रवचण देत व अलामोंच्या गॉस्पेल साहित्याचे वाटप केले आहे. मी अनेक प्रकारच्या कामांतले कौशल्य आत्मसांत केले आहे. पॅस्टर टोनी अलामो, माझे चांगले मित्र झाले आहेत आणि त्यांनी मला अध्यात्मिकरित्या खूप मदत केली आहे.

ही ख्रिश्चन मिनिस्ट्री एखाद्याच्या आत्म्यासाठी खरोखर सुरक्षित आहे. ईश्वराने मला हे स्थळ दिल्याबद्दल मी खूप आनंदी आहे अन्यथा मी स्वत: ख्रिश्चन म्हणून घेणाऱ्या लोकांसारखी झाली असती ज्यांती असे वाटते की ते रोग्य मार्गाने स्वर्गाकडे जात आहेत मात्र धर्मग्रंथानुसार ते नरकाच्या वाटेवर असतात. मी ईश्वराचे आणि पॅस्टर टोनी अलामो, तसेच ख्रिश्चन मिनिस्ट्रीमधील सर्व बंधू भगिनी ज्यांनी मला योग्य मार्ग दाखवला, आणि माझ्या आयुष्यात चांगला बदल घडवून आणला त्या सर्वांचे अत्यंत आभार मानतो आणि त्यांची तारीफ करतो.





*पाद्री के.एस.मनोहर (डाव्या बाजूला वरती आणि खाली उजव्या बाजूला) आंध्र प्रदेश,विशाखापट्टणम्,भारत येथे पॅस्टर अलामो, लिखित मन जिंकणारे करणारे साहित्य वाटत असताना.*

## रशिया

नमस्कार,

तुमच्या विचारांवर आधारित हस्तपत्रकांबद्दल खूप आभारी आहे.

मी ती पत्रके बायबलसोबत पडताळून पाहिली आणि ते खरोखरच सत्य आहे! आता माझादेखील तोच विश्वास आहे. दुर्दैवाने, रशियामध्ये विश्वास ठेवणे खूप अवघड आहे. त्यापैकी काही पत्रके मी आत्म्यांचा शोध घेणाऱ्यांना वाटली, परंतु मी वाईट लोकांच्या तावडीत सापडलो आणि त्यांनी मला झोडपले कारण मी हे सत्य सांगत होतो. मी आपल्या पत्रांस उत्तर बऱ्याच काळानंतर देत आहे त्याबद्दल क्षमस्व!

मी एक गरीब माणूस आहे व माझ्याकडे इंटरनेटची सोय नाही.सध्या मी अतिशय कठीण परिस्थितीमधून जात आहे कारण मला नोकरी नाही व त्यामुळे मला रोजचे जेवण मिळणे मुष्कील झाले आहे. कृपया आपण माझ्यासाठी प्रार्थना कराल का? मी तुम्हाला पुढचे पत्र लवकरच पाठवायचा प्रयत्न करेन. मला बाप्तिस्माबद्दल जाणून घ्यायचे आहे.

तुमचा रशियातील मित्र,

मॅक्सिम आर.

## केनिया

प्रिय टोनी अलामो, ,

मला तुमचे प्रसारण ऐकायला मिळाले याबद्दल मी परमेश्वराचे आभार मानतो. मी आपल्या कार्यक्रमातून अनेक गोष्टी शिकलो. तुम्ही, जगावे कसे, आणि प्रेम कसे करावे आणि आरोग्य व कुटुंब अशा गंभीर गोष्टींबद्दल बोलता. ईश्वराने तुमच्या माध्यमातून मला, माझ्या कुटुंबाला आणि माझ्या पालकांना वाचवले आहे. मला काही उपयुक्त ख्रिश्चन वाचन साहित्य पाठवा.

ईश्वराच्या पवित्र नावाने,

सायमन गुगी न्याहुरूरू, केनिया

## क्युबा

स्पॅनिश भाषेवरून अनुवादित

प्रिय बंधू पॅस्टर अलामो,

आपल्या मनाच्या सर्व इच्छा पुऱ्या होवोत अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. आपणांस नवीन वर्षाच्या शुभेच्छा!

मी आपला अत्यंत आभारी आहे कारण शेवटी मला हव्या असलेल्या सीडी आणि "टोनी अलामो" टी-शर्ट मला मिळाले. त्यामुळे मला आनंद झाला आहे. पॅस्टर बऱ्याच जणांना तुमचे वार्तापत्र आणि द मसीहा हे पुस्तक मिळाले आहे, अनेकांवर त्याचा प्रभाव पडला आहे, त्यामुळे अनेकांना येशू ख्रिस्ताबद्दल स्पष्ट व विशाल ज्ञान मिळाले. तुमच्या वार्तापत्रामुळे बऱ्याच आत्म्यांचा उत्साह वाढला आणि त्यांचे जीवन उजळून निघते. आम्हाला प्रवचनासाठी अधिक अवधी व अधिक स्वातंत्र्य हवे आहे. परंतु आम्ही तेच करू, ज्याचा मार्ग ईश्वर दाखवेल. आम्ही सारे तुमच्यासाठी सतत प्रार्थना करत असतो. मागे पडू नका. आपले काम सुरू ठेवा. ईश्वराचे आपल्यावर प्रेम आहे. "सावध आणि जागरुक असा" कारण तुमचा वैरी जो सैतान तो गर्जना करीत फिरणाऱ्या सिंहासारखा कोणाला गिळावे म्हणून सगळीकडे फिरतअसतो.

त्याचा विरोध करा आणि तुमच्या विश्वासात खंबीर राहा.

कारण तुम्हाला माहीत आहे की, जगभर असलेल्या बंधू-भगिनींना अशाच प्रकारचे दु:ख सहन करावे लागले, जसे तुम्ही सध्या अनुभवीत आहात. (१पीटर ५:८-९).

माझे आपल्यावर खूप प्रेम आहे!

आपला डाय़े मेडलिडयास हवाना, क्युबा

## फिलिपाईन्स

माझ्या प्रवासात सहभागी झाल्याबद्दल मी अत्यंत आभारी आहे. माझ्या अध्यात्मिक गरजा पूर्ण करण्यात तुमच्या कार्यक्रमाचा मोठा सहभाग आहे. तुमच्या आशेच्या संदेशामुळे आराम व दिलासा मिळाला आणि संकटांना तोंड देत पुढे जाण्याची प्रेरणा मिळाली. बरेचदा अशी परिस्थिती येते की माझा धीर खचतो परंतु अशा वेळी मला तुमचा संदेश आठवतो की मी जर माझ्या ईश्वरावर विश्वास ठेवला ही वेळ देखील निघून जाईल. पुन्हा एकदा धन्यवाद. आणिआत्म्यांना वाचवण्याचे महान कार्य काम असेच सुरू ठेवा.

आपला विश्वासू,

जोसेलिन ओगायॉन,

क्वेझॉन सिटी, फिलिपाईन्स

## स्वर्गात घडणारी आश्चर्ये आणि त्यांच्या पृथ्वीवर दिसणाऱ्या खुणा

*(पान ५ वरून पुढे सुरू)*

जर कमी ठेवले नसते तर कोणीच वाचले नसते. परंतु त्याच्या निवडलेल्यांमुळे तो ते दिवस कमी करील." हा आता जगाचा अंत आहे. इतरांनी जगाचा अंत आहे असे म्हटले आणि एक तारीख दिली जणू काही ईश्वाराने निवडलेली नेमकी वेळ त्यांना माहीत होती. परंतु मी तसे करत नाही, परंतु मी असे नक्की सांगतो की हा शेवट आहे. तुम्हाला असे वाटत नाही का की तुमच्या पापांबद्दल पश्चाताप करण्याची आणि आत्म्याच्या नावाने पुनर्जन्म घेण्याची हीच वेळ आहे, जर तुमची तशी इच्छा असेल, तर ही प्रार्थना म्हणा:

**"हे प्रभू आणि हे ईश्वरा, माझ्या आत्म्यावर, एका पाप्यावर दया कर.[९] माझा विश्वास आहे की येशू ख्रिस्त हा जिवंत ईश्वराचा पुत्र आहे.[१०] माझा विश्वास आहे की त्याने माझी आधीची सर्व पापे माफ व्हावीत यासाठी तो सुळावर मृत्यू पावला आणि स्वत:चे मौल्यवान रक्त सांडले. [११] माझा विश्वास आहे कि ईश्वराने पवित्र आत्म्याच्या शक्तीद्वारे येशूला मृतावस्थेतून उठवले आहे,[१२] आणि ईश्वराच्या उजव्या बाजूला बसून तो या क्षणाला माझ्या पापांचा कबुलीजबाब आणि ही प्रार्थना ऐकत आहे.[१३] हे येशू ख्रिस्ता, मी माझ्या हृदयाचे दार उघडून तुला माझ्या हृदयात येण्याचे आमंत्रन देत आहे.[१४] तु माझ्याऐवजी कॅवलरी येथे क्रुसावर जे रक्त सांडलेस त्या मौल्यवान रक्ताने माझी सर्व घाणेरडी पापे धुवून काढ. [१५] हे येशू ख्रिस्ता, तू मला दूर करणार नाहीस आणि माझ्या सर्व पापांना माफ करशील आणि माझ्या आत्म्याला वाचवशील. हे मला माहित आहे कारण तुझा शब्द म्हणजेच बायबल तसे सांगते[१६]. तुझा शब्द सांगतो की तू कोणालाही दूर लोटणार नाहीस आणि त्यामधे माझाही समावेश होतो.[१७] म्हणूनच मला माहित आहे की तू माझी प्रार्थना ऐकली आहेस मला माहित आहे की तू माझ्या हाकेला उत्तर दिले आहे आणि मला माहित आहे की तू मला वाचवले आहेस.[१८] हे येशू ख्रिस्ता, माझा आत्मा वाचवल्याबद्दल मी तुझे आभार मानतो आणि तुझी आज्ञा मानून आणि यापुढे आणखी कोणतेही पाप न करून माझी कृतज्ञता व्यक्त करतो[१९]**

मुक्ती मिळाल्यानंतर, पिता पुत्र व पवित्र आत्म्याच्या नावाने पाण्यात पूर्णपणे बुडवून, आपण बाप्तिस्मा घ्यावयाचा आहे[२०] बायबलचा नीट सखोलपणे अभ्यास करा आणि ते जे सांगते ते करा.[२१]

प्रभूला वाटते की तुम्ही इतरांना तुमच्या मुक्तीबद्दल सांगावे. आपण धर्मोपदेशक टोनी अलामोच्या गॉस्पेल देणाऱ्या साहित्याचे वितरक होऊ शकता. आम्ही ते आपल्याला मोफत देऊ. आम्ही आपणास हे साहित्य मोफत देवु. अधिक माहितीसाठी आम्हाला कॉल करा किंवा ई-मेल करा. हा संदेश इतरांपर्यंत पोहचवा.

जर तुम्हाला येशूच्या आदेशानुसार, हे जग वाचले जावे असे आपल्याला वाटत असेल तर ईश्वराला टायथिस आणि प्रसादापासून वंचित ठेवू नका. ईश्वराने म्हटले, मनुष्य देवाला ठकवील काय? तुम्ही तर मला ठकविले आहे; असे म्हणून तुम्ही म्हणता आम्ही कोणत्या बाबतीत तुला ठकविले आहे? दशमांश (टायथिस) आणि अर्पणे यासंबंधाने. तुम्ही एका शापाने शापित झाला आहात: कारण तुम्ही आणि या पूर्ण राष्ट्राने आणि [संपूर्ण जगाने] मला लुटले आहे.सेनाधीश परमेश्वर म्हणतो, माझ्या मंदिरात अन्न असावे म्हणून सगळा दशमांश (टायथिस-तुमच्या एकूण उत्पन्नाचा दहावा हिस्सा) तुम्ही भांडारात आणा म्हणजे मी आकाशकपाटे उघडून जागा पुरणार नाही एवढा आशीर्वाद तुम्हाकरिता वर्षितो की नाही याविषयी माझी प्रतीती पाहा. तुमच्या भूमीच्या पिकाची नासाडी होऊ नये म्हणून ते खाऊन टाकणाऱ्यास मी तुम्हासाठी धमकावीन; तुमच्या बागेतील द्राक्षलतांचे फळ अकाली गळणार नाही असे सेनाधीश ईश्वर म्हणतो." (मलाखी ३ :८ -१२ )

---

९ पिसा. ५१:५, रोम. ३:१०-१२, २३ **१०** मॅथ. २६:६३-६४, २७:५४, ल्युक १:३०-३३, जॉन ९:३५-३७, रोम. १:३-४ **११** ॲक्ट्स ४:१२, २०:२८, रोम. ३:२५, १जॉन १:७, रेव. ५:९ **१२** पिसा. १६:९-१०, मॅथ. २८:५-७, मार्क १६:९, १२:१४, जॉन २:१९, २१, १०:१७-१८, ११:२५, ॲक्ट्स २:२४, ३:१५, रोम. ८:११, १ कोर. १५:३-७ **१३** ल्युक २२:६९ ॲक्ट्स २:२५-३६, हिब.. १०:१२-१३ **१४** १ कोर. ३:१६, रेव. ३:२० **१५** ईफ. २:१३-२२, हिब. ९:२२, १३:१२, २०-२१, १ जॉन १:७, रेव. १:५, ७:१४ **१६** मॅथ. २६:२८, ॲक्ट्स २:२१, ४:१२, ईफ. १:७, कोल. १:१४ **१७** मॅथ. २१:२२, जॉन ६:३५, ३७-४०, रोम. १०:१३ **१८** हिब. ११:६ **१९** जॉन ५:१४, ८:११, रोम. ६:४, १कोर. १५:१०, रेव. ७:१४, २२:१४ **२०** मॅथ. २८:१८-२०, जॉन ३:५, ॲक्ट्स २:३८, १९:३-५ **२१** ड्यूश. ४:२९, १३:४, २६:१६, जोश. १:८, २२:५, २ टिम. २:१५, ३:१४-१७, जेम्स १:२२-२५, रेव. ३:१८

---

*कृपया अधिक माहितीसाठी व तुम्हाला रस वाटू शकेल अशा इतर विषयांवरील लेखनसाहित्यासाठी आमच्याशी संपर्क करा.*

**टोनी अलामो, जागतिक पॅस्टर, टोनी अलामो ख्रिश्चन मिनीस्ट्रीज वर्ल्डवाईड, पोस्ट बॉक्स २९४८ , हॉलिवूड, कॅ. ९००७८**

**प्रार्थना व माहितीकरिता २४ तास उपलब्ध: (६६१ ) २५२ -५६८६ • फॅक्स (६६१ ) २५२ -४३६२**

**www.alamoministries.com • taoffice@alamoministries.com**

*यू.एस.मधील ज्या व्यक्तीं, आपले तन, मन, हृदय, ताकद व आत्मा अर्पून ईश्वराची सेवा करतील, अशा व्यक्तींना जगभरातील, टोनी अलामो ख्रिश्चन मिनिस्ट्रिज, अशी जागा पुरवते की जिथे जगण्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी मिळतील*

**न्यूयॉर्क शहरांत दर मंगळवारी रात्री ८ वा. व इतर ठिकाणी प्रत्येक रात्री सेवा आयोजित करण्यात येतात.अधिक माहिती-साठी कृपया (९०८ ) ९३७ - ५७२३ या क्र.वर फोन करा.**

प्रत्येक सेवेनंतर जेवण दिले जाईल.

ख्रिश्चन पॅस्टर अलामो यांनी लिहिलेले पुस्तक "द मसीहा" मागून घ्या. यामध्ये जुन्या करारामधील ३३३ च्यावर गोष्टींतून ख्रिस्ताबाबतचा पुरावा दिला आहे.

*धर्मोपदेशक अलामो यांच्या लेखी साहित्याचे वाटप करून लोकांची आत्मोन्नती करणारे सेवक म्हणून काम करा.*

*आमचे सर्व लेखी साहित्य व ऐकण्याचे संदेश ,शिपिंग शुल्कासह, नि:शुल्क पाठवले जातात.*

*जर त्यासाठी कुणी तुमच्याकडून पैसे घेत असेल तर कृपया पुढील क्र. वर फोन करा. (६६१ ) २५२ -५६८६ कलेक्ट.*

**या लेखी साहित्याद्वारे मुक्तीसाठी खरा मार्ग कोणता हे दाखवले जाते. (प्रेषितांची कृत्ये४ :१२ ).**

**हे साहित्य फेकू नका. कृपया दुसऱ्या कोणाला तरी ते वाचायला द्या.**

**जे कोणी दुसऱ्या देशांमध्ये असतील त्यांनी कृपया हे साहित्य त्यांच्या देशांतील बोली भाषांमध्ये अनुवादित करावे.**

**जर आपण हे साहित्य पुन्हा प्रकाशित करणार असाल तर कृपया खालील कॉपीराईट व रजिस्ट्रेशनचा समावेश करा.**

Copyright march 2013 all rights reserved world pastor tony alamo Registered march 2013 कॉपीराईट: मार्च २०१३, सर्व हक्क सुरक्षित.

MARATHI—VOLUME 17700—*WONDERS IN HEAVEN ABOVE AND SIGNS IN THE EARTH BENEATH*